बुधवार, दि ४ सप्टेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ११ वे ● अंक ५१ वा ● किमंत २ रु. ● पाने ४

RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# जिल्हाधिकाऱ्यांच्या दौऱ्याचा जिल्हा माहिती अधिकाऱ्यांना पडला विसर!

## महासंचालनालयाच्या जालना जिल्हा माहिती कार्यालयाला दौऱ्याची माहितीच नाही?

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाच्या प्रसिद्धीच्या कामाचे संपुर्ण समन्वयन करणार यंत्रणा म्हणून माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची ओळख आहे. या च महासंचालनालयाच्या अख्यारित येत असलेले जालना जिल्हा माहिती कार्यालयालयाला जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांनी मंगळवार (दि ३) रोजी अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचा पाहणी दौरा काढल्याचा विसर पडला की असा प्रश्न उपस्थित होत आहे. दुपारी झालेल्या जिल्हाधिकारी यांच्या दौऱ्यासंदर्भाचे वृत्त जिल्हा माहिती कार्यालयाकडून रात्री उशिरापर्यंत माध्यम ांकडे प्रसिद्धीस दिले नसल्यामुळे जिल्हा माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दौऱ्याबाबत जिल्हा माहिती कार्यालयाला कळविले की नाही याबाबत स्पष्टता नाही.



जालना जिल्ह्यातील विविध भागात अतिवृष्टी झाली मंठा-परतूर तालुक्यात तर ढगफुटीसदृश पाऊस झाल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले असून यासंदर्भात त्यांनी तातडीने नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे. तसेच मंठा तालुक्यातील शिवसेना (शिंदे गट) तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांनीही जिल्हाधिकाऱ्यांकडे पाहणी करुन एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये अशी मागणी केली आहे. याच सह विविध पक्षातील नेते पदाधिकारी अतिवृष्टीची पाहणी व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी करत असतांना जिल्ह्याचे प्रथम नागरिक जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी तत्परतेने मंठा तालुक्यातील काही गावांचा मंगळवार (दि ३) रोजी दौरा केला. या दौऱ्या संदर्भातील वृत्त हे जिल्हा माहिती कार्यालयाकडून वृत्तपत्रांना देणे अपेक्षित असते. असे असले तरी या गंभीर बाबीचा जिल्हा माहिती अधिकारी व कार्यालयाला विसर पडला असून मंगळवार (दि ३) रात्री उशिरापर्यंत माध्यमांना कोणतेही वृत्त यासंदर्भाने ई-म ेल, व्हॉटसअप करण्यात आलेले नाही. विशेष म्हणजे यापुर्वी जिल्ह्यात अशी घटना घडलेले ऐकिवात नाही. दुसरे म्हणजे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून याबाबत माहिती कार्यालयाला कळविण्यात आले की नाही याबाबत स्पष्टता नाही. अथवा त्यांनी कळविणे हे बंधनकारक आहे की, प्रसिद्धी करणे हे जिल्हा माहिती अधिकारी यांचे कार्य आहे की नविन काही नियम ावली महासंचालनालयाकडुन काढण्यात आली याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा युवा आदर्शने प्रयत्न केला मात्र, रात्री उशिरामुळे संपर्क होऊ शकला नाही.

महाराष्ट्र शासनाचे विविध कल्याणकारी निर्णय, उपक्रम, धोरणे, विविध मोहिमा आणि विविध योजनांची माहिती या यंत्रणेद्वारे जनतेपर्यंत पोहचविण्यात येते. दैनंदिन वृत्तविशेष प्रसारित करणे, प्रसिद्धी साहित्याची निर्मिती करून वाटप करणे, विविध विषयांवर माहितीपट निर्माण करणे, राज्य विभागीय पान ३ वर

### माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने तालुका माहिती कार्यालयाची निर्मिती करावी!

तालुकास्तरावर होत असलेले शासनाचे महत्त्वाचे दौरे, जनसामान्यांचे शासनस्तरावरुन होत असलेल्या समस्यांचे निराकरणबाबत जर जिल्हा माहिती कार्यालयाकडुन माध्यमांना कळविण्यात येत नसेल तर महासंचालनालयाने तालुका माहिती कार्यालयाची निर्मिती करावी, जेणेकरुन जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद, पंचायत समिती यांच्या माध्यमातून अधिकाऱ्यांनी तालुकास्तरावर केलेल्या कार्याची माहिती ही माध्यमांना पुरविता येईल?

# जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांची अतिवृष्टी भागात पाहणी; शेतकऱ्यांशी चर्चा

## तालुक्यातील एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, उदयसिंह बोराडे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**मंठा । प्रतिनिधी -** तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त भागाची जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी मंगळवार (दि ३) रोजी पाहणी केली असून प्रशासनाला योग्य त्या सूचना दिल्या आहेत.

मंठा तालुक्यासह परिसरात गेल्या दोन-तीन दिवसांमध्ये झालेल्या मुसळधार पाऊस व वारा-वादळामुळे शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले. या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याची मागणी या परिसरातील शेतकऱ्यांसह शिवसेनेचे तालुकाप्रमुख (मंठा) उदयसिंह बोराडे यांनी परिसरातील नुकसानीची सोम वार (दि २) पाहणी केली. त्यानंतर जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांची भेट घेत त्यांनी तात्काळ पंचनामे करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी कार्यवाही करण्याबाबत सांगितले. श्री बोराडे यांच्या विनंतीनंतर जिल्हाधिकारी यांनी मंगळवार (दि ३) मंठा तालुक्यातील वाडी रानमळा, पांगरी खु. केंधळी आदी भागातील नुकसानग्रस्त पीकांची पाहणी केली. नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करुन तात्काळ अहवाल सादर करण्याच्या सुचना संबंधीत विभागाला यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या असून एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नसल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

प्रसंगी त्यांच्यासमवेत उपविभागीय अधिकारीयांच्यासह तहसीलदार सोनाली जोंधळे, मंडळ अधिकारी गणेश कुलकर्णी, मंडळ अधिकारी श्रीकांत गादेवाड, कृषी अधिकारी कैलास राजबिंडे, पान ३ वर



युवा आदर्श

### दुकानदारी ...

**माझ्या दुकानी दिसे**
**हात कमळा शेजारी**
**गुण्या गोविंदे नांदते**
**कुणाची नसे मुजोरी**
**दिमाखात पहादोन्ही**
**धनुष्याजवळ तुतारी**
**बंधुत्व भाव आगळा**
**सौहार्द चित्र चितारी**
**इंजिनात बसले हत्ती**
**चिन्हे समस्त दरबारी**
**दुखवत नाही कुणास**
**घेतात पुरी खबरदारी**
**घड्याळात कप बशी**
**धंद्याला मिळे उभारी**
**सामग्री खरेदी कराया**
**व्यग्र सगळे कारभारी**
**विविध पक्ष भिन्न रंग**
**झेंडे शोभती जरतारी**
**दुकानाबाहेर पडताचं**
**चिन्हा होते काहीतरी**
**इकडे राहिले सुखेनैव**
**बाहेर जाता होई वैरी**
**सोडतेपायरी आपली**
**उतरता दुकान पायरी**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.


# दहीहंडी; अत्त्याचाऱ्यांना फाशीच्या शिक्षेचा संदेश!

## डिजेच्या तालावर माजी राज्यमंत्री खोतकरांसह गोविंदाचा जल्लोष

**जालना । प्रतिनिधी -** बदलापूर, कलकत्ता सह देशभरात घडणाऱ्या महिला अत्याचाराच्या अमानवी घटनांतील नराधमांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे असा संदेश युवा हिंदुत्व प्रतिष्ठानने दहीहंडी महोत्सवातून दिला. डीजेच्या तालावर शिवसेना उपनेते, माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्यासह गोविंदांनी ठेका धरत एकच जल्लोष केला.

गोकुळाष्टमी चे औचित्य साधून जालना शहरातील छत्रपती संभाजी नगर लगत असलेल्या स्व. गोपीनाथराव मुंढे चौकात युवा हिंदुत्व प्रतिष्ठानच्या वतीने यंदा प्रथमच दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. शिवसेना उपनेते, माजी मंत्री अर्जुनराव खोतकर, युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर, रिलस्टार पल्लवी सरकटे- भुतेकर,विष्णू पाचफुले, मनसेचे जिल्हाप्रमुख रवींद्र राऊत, मेघराज चौधरी, दीपक जगताप,प्रकाश जगताप, राजेश जगताप, यशराज खोतकर, अंकुश पाचफुले,सतीश जाधव, योगेश भगत, मनोज लाखोले, दीपक राठोड ,अजित चौधरी, शिवसिंग तिलवारे , अभिषेक काबलिये ,राजू गुलगे, यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यावेळी शुभेच्छा देतांना म्हणाले, भगवान श्रीकृष्णांनी १८ पगड जातीतील गोविंदा- गोपाळांना एकत्र करून समान वागणूक दिली. असे सांगून युवा हिंदुत्व प्रतिष्ठानने दहीहंडी उत्सवाच्या माध्यमातून व्यक्त केलेली संतापाची भावना,





दिलेला संदेश आपण मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचविणार असल्याचे खोतकर यांनी याप्रसंगी सांगितले. विष्णू पाचफुले ,रवींद्र राऊत, पल्लवी सरकटे- भुतेकर यांनी शुभेच्छा दिल्या.

प्रास्ताविक आकाश जगताप पाटील यांनी केले तर बालाजी टेकाळे यांनी सूत्रसंचालन केले. दहीहंडी महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी आकाश जगताप, कृष्णा जगताप ,उमेश पवार, रोहित साखरे, सचिन तारगे ,शंकर ठोकर, शुभम जगताप ,संकेत शीलवत, यश शर्मा, गणेश पाखरे, निलेश दानवे, शुभम डुकरे ,सचिन काटकर ,सुशील दंडाईत, शुभम शिंदे, ऋषिकेश शहागडकर ,कृष्णा गावडे, पान ३ वर

# संपादकीय

## गुटखा बंदी; बारा वर्षांनंतरही...

केंद्र सरकारने २०११ मध्ये तंबाखू व निकोटीन याची कुठल्याही प्रकारे अन्न पदार्थात मिसळ केल्यास गुन्हा ठरणार असल्याचे अन्न व सुरक्षा कायद्यात नमूद केले होते. त्यानंतर देशातील काही राज्यांनी गुटख्यावर बंदी घातली होती. महाराष्ट्र राज्यात २० जुलै २०१२ रोजी गुटखा बंदीचा निर्णय झाला. त्याला आज बारा वर्षांपेक्षा अधिकचा काळ लोटला आहे. जुलै २०१२ पासून गुटखा आणि पान मसाला उत्पादन, विक्री आणि वितरणावर बंदी आणली. या कायद्यातील तरतुदीनुसार गुटख्याचे उत्पादन, जाहिरात आणि विक्री करणे हा गुन्हा ठरविण्यात आला. पण ना त्याची कडक अंमलबजावणी झाली ना गुटखा विक्री थांबली शेजारच्या राज्यातून खुष्कीच्या मार्गाने विविध वाहनांचा वापर करुन गुटखा विक्रीसाठी महाराष्ट्रात आणला जातो. जालना शहर व जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणात गुटखा येतो आहे. गुटखा बंदीनंतर अनेकांनी मावा-गुटखा विक्रीचा नवा व्यवसाय सुरु केल्याची स्थिती आहे. जालना शहरातील भोकरदन नाका परिसरात असलेल्या पान टपऱ्यांवर तर बेदिक्कत गुटखा विक्री सुरु असून या व्यवसायिकांना अन्न व औषधी प्रशासनासह पोलीसांचा धाक नसल्याचे चित्र आहे. याच ठिकाणाहून एक घाऊक गुटखा विक्रेता जिल्ह्यासह व जिल्ह्याबाहेरही गुटखा विक्री करतो. अनाधिकृत पणे सांगतांना हा गुटखा विक्रेता पोलीसांना भरणा भरवा लागतो. तेव्हा कुठे व्यवस्थीत सुरु असल्याचे सांगतो. ऐन पोलीस चौकीच्या आसपास होणाऱ्या ही गुटखा विक्री व गुटख्याची होलसेल उलाढाल होत असल्याचे आश्चर्य आहे. तरुणांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी व निरोगी, सदृढ समाज निर्मितीसाठी हातभट्टी दारू, गुटखा, मावा विक्रीवर कडक निर्बंध घातलेले आहेत. पण शासकीय यंत्रणांच्या दुर्लक्षामुळे त्याचे पालन होत नाही. काही भ्रष्ट अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या आश्रयात हे अवैध व्यवसाय सुरु असतात. पान मसाला, तंबाखूजन्य पदार्थ हे अन्न या सदरात मोडत असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केल्यामुळे गुटखाबंदी राबविण्याची जबाबदारी महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनावर सोपविण्यात आली होती. गुटखा बंदीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ५ फेब्रुवारी २०२० रोजी उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत पोलीसांनाही कारवाई करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले. असे असले तरी अन्न व औषधी प्रशासन असो अथवा पोलसी प्रशासन असो यांच्याकडुन कारवाया होत असल्या तरी गुटखा उपलब्धतेमुळे त्यांच्या कारवाईच्या भुमिकेवर संशय निर्माण होत आहे. युवकांच्या सदृढ व निरोगी आरोग्यासाठी प्रशासनाने कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

# प्रकटपणे समाज व धर्मसुधारणेचे कार्य!

जसे कृता-त्रेतायुगात श्री दत्तात्रेय आणि द्वापारयुगामध्ये श्रीकृष्ण हे परमेश्वर अवतार झाले, तसे कलियुगात श्री चक्रधर स्वामी हे बाराव्या शतकातील परमेश्वर अवतार आहेत. ते महानुभाव पंथाचे संस्थापक आहेत. ते महानुभाव पंथाच्या तत्त्वज्ञानानुसार ईश्वराच्या पंचावतारांपैकी पाचवा अवतार आहेत. लीळाचरित्र या मराठीतील पहिला चरित्रग्रंथ लीळाचरित्र याचे केंद्रबिंदू श्री चक्रधर स्वामीच आहेत. इतिहासात त्यांना महत्त्वाचे स्थान आहे. वैदिक परंपरेला नाकारून स्त्री-शूद्रांसह सर्वांना मोक्षाचा समान अधिकार देणाऱ्या सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांचे नाव महाराष्ट्रातील समाजसुधारकांमध्ये अग्रक्रमाने घ्यावे लागेल. भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधरस्वामींच्या भक्तीच्या प्रेरणेतून जे साहित्य त्यांच्या भक्त व अनुयायांकडून निर्माण झाले. त्यामुळे मराठी साहित्यपरंपरेची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली आहे. आणखी वाचा कृगोनि- कृ. गो. निकोडे गुरूजींच्या या लेखात...

भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांच्या प्रारंभिक जीवनासंबंधी माहिती लीळाचरित्राच्या एकांक या भागात मिळते. बाराव्या शतकाच्या पूर्वार्धात गुजराथमधील भडोच येथे दि.४ सप्टेंबर १२२१ अर्थात शके ११४२, भाद्रपद महिन्याच्या शुक्लपक्षाच्या रविवारी सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांचा अवतार झाला. त्यांचे वडील विशाळदेव हे भडोचचा राजा मल्लदेव यांचे प्रधान होते. त्यांच्या आईचे नाव माल्हणदेवी- माल्हाईसा होते. सर्वज्ञ श्रीचक्रधरांचे जन्म नाव हरिपाळदेव असे होते. तारुण्यात आल्यावर हरिपाळदेव यांचा विवाह कमळादेवी- कमळाईसा यांच्याबरोबर झाला. याच काळात त्यांनी युद्धांतही पराक्रम गाजवला. पुढे हरिपाळदेवांना आजारी लोकांची सेवा करायचा छंद लागला. बरेचदा ते राजवाडा सोडून आजारी लोकांबरोबर वेळ घालवू लागले. पुढे त्यांची प्रकृती अचानक खालावली व त्यांचा मृत्यू झाला. परंतु स्मशानात सरणावर ठेवल्यावर हरिपाळदेव जिवंत असल्याचे आढळून आले. महानुभावीयांच्या श्रद्धेनुसार यावेळी श्रीकृष्णाने त्यांच्या शरीरात प्रवेश करून अवतार धारण केला. पंचावतारातील तिसरा अवतार श्रीचांगदेव राऊळ यांचा त्याच सुमारास मृत्यू झाला होता. काही मतांनुसार त्यांच्या आत्म्याने हरिपाळदेवांच्या शरीरात प्रवेश केला. हरिपाळदेवांच्या शरीरात प्रविष्ट होणारा आत्मा स्वतंत्र ईश्वरी आत्मा होता. ही अवतारधारणाची घटना शक संवत्सर ११४२ भाद्रपद महिन्याच्या शुक्लपक्षाच्या रविवारी घडली. या घटनेनंतर चक्रधरांचे आयुष्य पूर्वीप्रमाणेच सुरू झाले. कालौघात त्यांना एक पुत्रही झाला. त्यांचे आजारी लोकांना सेवा देणे मात्र तसेच सुरू राहिले. एक दिवस काही रुग्णांना फारच खर्च लागल्यामुळे त्यांना उसने घ्यावे लागले. त्यांनी देणेकऱ्यांचे पैसे जोपर्यंत देणार नाही तोपर्यंत अन्नप्राशन करणार नाही, अशी शपथ घेतली. त्यांच्या पत्नीने त्यांना या कारणासाठी दागिने देण्यास नकार दिला. शेवटी त्यांच्या वडिलांनी त्यांच्या नकळत देणेकऱ्याचे पैसे परत केले. या घटनेमुळे हरिपाळदेव यांना औदासीन्याने ग्रासले. लौकिक प्रपंचातून त्यांचे मन उडाले. त्यांनी राजविलासी भोग, संसार-सुख यांचा त्याग करून लोकसेवा करण्याचा निर्णय घेतला.

गृहत्याग करण्यासाठी हरिपाळदेवांनी रामाच्या दर्शनास रामटेक येथे जावयाचे आहे, अशी सबब घरी सांगितली. त्यावेळी महाराष्ट्रातील यादव व भडोचचे राज्य यांच्यात कलह सुरू होता. त्यामुळे त्यांच्या वडिलांनी या कल्पनेस विरोध केला. परंतु शेवटी हरिपाळदेवांनी वडिलांचे मन वळविले व त्यांच्या वडिलांनी त्यांना संरक्षणासाठी घोडेस्वार व सेवक यांच्यासह जाण्यास अनुमती दिली. त्यांना आपल्यासोबतचा लवाजमा नको होता. त्यांना सर्वस्व त्याग करावयाचा होता. त्यामुळे त्यांनी एकेका मुक्कामावरून आपले क्षेमकुशल कळवण्यासाठी एकेक सैनिक परत पाठवणे सुरू केले. शेवटी अमरावती जिल्ह्यातील देऊळवाडा येथे काजळेश्वराच्या मंदिरात मुक्कामास असतांना त्यांचे सैनिक निद्राधीन झाल्याचे पाहून आपली राजवस्त्रे तिथेच काढून ठेवून दोन वस्त्रांनिशी ते तिथून निघून गेले. सर्वस्वाचा त्याग करून भ्रमण करत असतांना हरिपाळदेव ऋद्धिपूर येथे आले. तिथे त्यांना विरक्त अवस्थेतील श्री गोविंदप्रभू दिसले. श्री गोविंदप्रभूंपासून हरिपाळदेव यांना शक्ती प्राप्त झाल्या. याचवेळी गोविंदप्रभूंनी त्यांना चक्रधर हे नाव दिले.

श्री गोविंदप्रभूंपासून शक्ती मिळाल्यानंतर श्री चक्रधरांची विरक्ती अधिकच वाढू लागली. लीळाचरित्राच्या एकांक या भागात त्यांच्या या काळातील भ्रमंतीचे वर्णन आहे. अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डीपासून आठरा कि.मी. अंतरावरील येळी या गावी आले. लीळाचरित्र या मराठी भाषेतील पहिल्या चरित्रग्रंथात काही काळ ते येळी या ठिकाणी वास्तव्यास आल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. येळी या ठिकाणी नदी किनारी महानुभाव पंथीय मंदीर आहे. या काळात त्यांनी महाराष्ट्रभर एकट्यानेच भटकंती केली. आंध्र प्रदेशाच्या काही भागातही त्यांनी भ्रमण केले. यावेळेपर्यंत त्यांना फारसा शिष्यपरिवार लाभला नव्हता. एकाप्रसंगी तर ते गाईच्या गोठ्यात जाऊन झोपले. एकाप्रसंगी वरंगळ येथील एका घोड्याच्या व्यापाऱ्याने आपल्या हंसांबा नामक मुलीचे श्री चक्रधरांसोबत लग्नही लावून दिले. तिथे काही दिवस राहून ते परत संन्यस्त झाले. गोंडवनातील आदिवासींच्या सहवासातही ते काही दिवस राहिले. या काळात त्यांना तुरळक शिष्य लाभले, त्यांपैकी वडनेरचे रामदेव दादोस हे प्रमुख होते. त्यांच्यामार्फतच पुढे श्री चक्रधरांना नागदेव, आबाइसा, महादाइसा, उमाइसा इत्यादी शिष्यपरिवार मिळाला. या भ्रमंतीच्या काळात त्यांची मेहकर येथे बाणेश्वराच्या मंदिरात बोणेबाईंची भेट झाली. बोणेबाईंना देवकी व स्वतः श्रीकृष्ण बनवून त्यांनी मेहकर येथे गोकुळाष्टमी साजरी केली. बोणेबाईंबरोबर त्यांनी लोणारची यात्राही केली. नंतर एके दिवशी सिंहस्थ यात्रेच्या निमित्ताने ते बोणेबाईंबरोबर त्र्यंबकेश्वरला जाण्यास निघाले. वाटेत पैठण येथे त्यांनी त्र्यंबकेश्वरास जाण्याचा बेत रद्द करून पैठण येथेच विधिवत संन्यासाची दीक्षा घेतली. ही घटना शके ११८९ मध्ये घडली. अशा तऱ्हेने ऋद्धिपुरापासून सुरू झालेले श्री चक्रधरांचे एकाकी भ्रमण पैठण येथे संपले. यानंतरच्या काळात त्यांनी प्रकटपणे समाज व धर्मसुधारणेचे त्यांचे कार्य सुरू केले. एकाकी भ्रमणाच्या काळात त्यांनी लोकजीवन प्रत्यक्ष पाहिले. त्या काळातील सामाजिक व धार्मिक परिस्थितीचे अवलोकन केले. त्यांच्या पुढील ज्ञानदानाच्या कार्याची पूर्वतयारीच या काळात झाली. त्यांनी आपले अवतार कार्य उरकून दि.७ फेब्रुवारी १२७४ रोजी नश्वर देहाचा त्याग केला आणि विशाल अनंतात विलीन झाले. जयंतीच्या पावन पर्वावर त्यांना कोटी कोटी दंडवत प्रणाम!

श्री कृ. गो. निकोडे
पोटेगांवरोड, गडचिरोली,
फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.

# साथीचे आजार टाळण्यासाठी योग्य ती खबरदारी गरजेची

राज्याला पावसाने चांगलेच झोडपल्याने राज्यात सध्या साथीच्या आजाराने डोके वर काढले आहे. डेंग्यू, मलेरिया, चिकणगुणिया यासारख्या साथीच्या आजाराने राज्यातील नागरिक हैराण झाले आहे. साथीच्या आजाराने रुग्णांची संख्या वाढत चालल्याने आरोग्य विभागाची डोकेदुखी वाढली आहे. राज्यात डेंग्यू, मलेरिया आणि चिकणगुणियाचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळत आहे विशेषतः राज्यातील महापालिका क्षेत्रात मुंबई मध्ये डेंग्यू आणि मलेरियाचे, गडचिरोली जिल्ह्यात मलेरिया आणि कोल्हापूर जिल्ह्यात डेंग्यूचे सर्वाधिक रुग्ण आहे. नागपूरसह संपूर्ण विदर्भात देखील डेंग्यूचे रुग्ण आढळत आहे.

पुण्यातही जवळपास तीच परिस्थिती आहे त्यामुळे आरोग्य खाते अलर्ट मोडवर आले आहे. मागील काही दिवसांपासून विशेषतः पावसाला सुरवात झाल्यापासून साथीच्या आजाराने डोके वर काढायला सुरवात झाली आहे. डेंग्यू, मलेरिया, चिकणगुणिया यासोबतच सर्दी, खोकला, डोकेदुखी, ताप, शिंका येणे यानेही नागरिक त्रस्त झाले आहेत. चार वर्षांपूर्वी राज्यातच नव्हे तर संपूर्ण जगात कोरोनाने हाहाकार उडवला होता. कोरोना देखील संसर्गजन्य रोग होता त्यातून आपण आता कोठे सावरलो आहोत तोच आता या साथीच्या आजाराने डोके वर काढले आहे अर्थात हे साथीचे आजार कोरोना इतके धोकेदायक नसले तरी त्याकडे दुर्लक्ष करणे ही मोठी चूक ठरू शकते म्हणूनच आरोग्य खात्याने ही साथ मोडून काढण्यासाठी कंबर कसली आहे. ही साथ अधिक वाढू नये म्हणून आरोग्य खाते सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहे. आरोग्यखाते त्यांची जबाबदारी पार पाडतच आहे पण आरोग्य खात्यासोबतच नागरिकांनी आणि प्रशासनाने देखील ही साथ आणखी वाढू नये यासाठी याबाबत काळजी घ्यायला हवी. वास्तविक दरवर्षी पावसाळा सुरू झाला की साथीचे आजार पसरतात पण ते पसरू नये यासाठी पावसाळ्यापूर्वीच खबरदारी घेतली जात नाही.

या साथीबाबत नगरपालिका असो की महानगरपालिका उदासीनच दिसून येते. दरवर्षी कचऱ्याचे ढीग, घाणीचे साम्राज्य, सांडपाण्याचे डबके यांचे वेळीच सर्वेक्षण केले जात नाही. त्यामुळे शहरात जागोजागी असलेले कचऱ्याचे ढीग, सांडपाण्याचे डबके, आणि घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसते. याची वेळीच विल्हेवाट लावली गेली असती तर आज ही वेळ आली नसती. डेंग्यू, मलेरिया, चिकणगुणिया यासारखे साथीचे आजार हे डासांमुळे होतात. ज्या ठिकाणी घाणीचे साम्राज्य असते अशा ठिकाणी डासांची उत्पत्ती होते. शहरातील हे घाणीचे साम्राज्य कमी झाले की डासांचे प्रमाणही कमी होईल.

प्रशासनाने शहरातील घाणीचे साम्राज्य कमी करण्यासाठी तसेच शहरात कचऱ्याचे ढीग पसरू नयेत यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करायला हवेत. तसेच शहरात सर्वत्र औषध फवारणी करावी. डेंग्यूला कारणीभूत ठरणारा एडिस इजिप्ती हा डास गोड्या पाण्यात राहतो. डेंग्यूचे डास पसरू नयेत यासाठी नागरिकांनीही काळजी घ्यावी. नागरिकांना आपल्या घराच्या परिसरात, छतावर, भांड्यामध्ये, जुन्या वस्तूंमध्ये पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी. आपल्या घराचा परिसर स्वच्छ राहील याची काळजी सर्व नागरिकांनी घ्यावी. आठवड्यातील एक दिवस कोरडा दिवस पाळावा. याशिवाय नागरिकांनी सकस आहार घेणे, भरपूर पाणी पिणे, ज्यूस पिणे, नियमित व्यायाम करणे, अराम करणे, पुरेशी झोप घेणे आवश्यक आहे. कोणताही आजार किरकोळ आजार आहे असे समजून अंगावर काढणे धोकादायक ठरू शकते.

नागरिकांनी आजाराची लक्षणे दिसताच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. नागरिकांनी वैयक्तिक स्वच्छतेपासून सार्वजनिक स्वच्छतेपर्यंत विशेष काळजी घ्यावी. सरकारने प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, सोशल मीडियाद्वारे याबाबत जनजागृती करावी. शाळा महाविद्यालयातही याबाबतीत प्रबोधन करावे. वैयक्तिक, सामूहिक व शासकीय पातळीवर व्यापक प्रयत्न करूनच साथीच्या आजाराशी दोन हात करता येईल.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२२५४६२९५**

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# ई गव्हर्नन्समुळे 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहिण' योजनेची रक्कम कमी वेळेत थेट खात्यात जमा होणे शक्य - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## ई गव्हर्नन्स विषयक २७ व्या राष्ट्रीय परिषदेचा मुंबईत शुभारंभ




**मुंबई -** ई-गव्हर्नन्स हे फक्त तंत्रज्ञान नसून लोकांची विचार प्रवृत्ती बदलण्याचे माध्यम आहे. यामुळे पारदर्शकता येत असून सामान्य नागरिकांमध्ये प्रशासनाबाबत विश्वास निर्माण होतो. 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' या योजनेच्या पहिल्या दोन हप्त्याची रक्कम अतिशय कमी वेळेत थेट लाभार्थ्यांच्या खात्यात केवळ ई-गव्हर्नन्समुळे शक्य झाल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले. ई-गव्हर्नन्सविषयक २७ व्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन मुंबई येथे करण्यात आले. विकसित भारत : सुरक्षित आणि शाश्वत ई सेवा वितरण अशी संकल्पना असलेल्या या दोन दिवसीय परिषदेचा शुभारंभ मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, आमदार भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, मुख्य सचिव सुजाता सौनिक, केंद्रीय सचिव व्ही. श्रीनिवास, केंद्रीय सचिव एस.कृष्णन, केंद्रीय अतिरिक्त सचिव पुनीत यादव, माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव पराग जैन नैनुटिया, धोरणकर्ते, पुरस्कार विजेते, देशभरातील प्रतिनिधी, विविध राज्यातील शासकीय अधिकारी, तज्ज्ञ उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, महाराष्ट्रात घराची खरेदी-विक्री संदर्भातील मालमत्तेची नोंदणी ही कोणत्याही उपनिबंधक कार्यालयात करणे शक्य झाले आहे. सुशासनबाबत बोलताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या किमान सरकार, कमाल प्रशासन या वाक्याची आठवण होते. भविष्यात मालमत्ता खरेदी विक्री ही ऑनलाईन करण्याची प्रक्रिया सुरू आहे. आता मुख्यमंत्री सचिवालयात ई-ऑफिसद्वारे संपूर्ण फायलिंगचे काम होते. भविष्यात मंत्रालयातील कामे ई ऑफिसद्वारे होणार आहेत. राज्यात सेवा अधिकारांतर्गत सर्व सेवा ऑनलाईन पुरविण्यात येत आहेत.

मंत्रालयाच्या प्रवेशद्वाराजवळ केंद्रीय नोंदणी केंद्र सुरू केले असून येथे सर्व पत्रे स्वीकारली जात आहेत. यामुळे लोकांचे श्रम आणि वेळ यांची बचत होते. याचदृष्टीने आगामी काळात मुंबई, नवी मुंबई येथे डेटा सेंटर हब बनण्याच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. यासाठी आपल्याकडे उत्तम कुशल मनुष्यबळ असून तंत्रज्ञान आता ग्रामीण भागापर्यंत पोहोचवले असल्याचे मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी सांगितले.

ई गव्हर्नन्स प्रणाली राबविणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असून शासनाने माहिती तंत्रज्ञान धोरण तयार केले आहे. आता ए.आय. या तंत्रज्ञानाचा वापर उद्योग, कृषी, आरोग्य या क्षेत्रात केला जाणार आहे. प्रशासकीय कामात गती देण्याबरोबरच सर्वसामान्य जनतेला पारदर्शक न्याय मिळाला पाहिजे. भविष्यात प्रशासन अधिक प्रतिसादात्मक, सर्वसमावेशक आणि नागरिक केंद्रित होत असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते कळ दाबून सामान्य प्रशासन विभागाच्या प्रशासकीय सुधारणा, रचना व कार्यपद्धती याचे नाव बदलण्यात आले असून ते आता नाव प्रशासकीय नाविन्यता, उत्कृष्टता आणि सुशासन असे करण्यात आले.

# जगदीश आढव यांची ग्रामविकास अधिकारीपदी पदोन्नती

**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील टेंभुर्णी ग्रामपंचायत कार्यालयाचे ग्रामसेवक जगदीश आढाव यांची ग्रामविकास अधिकारीपदी पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी सरपंच गौतम म्हस्के, उपसरपंच शिवाजी मुळे, राजु खोत, अजिस बागवान, विक्रम उकांडे, बाबासाहेब जमधडे, दिगंबर भिसे, सुनिल भाले, अनिल गायकवाड, सुरज जागिड, शरद मघाडे, काळेगाव सरपंच वंसता चव्हाण यांची उपस्थिती होती. मनमिळाऊ स्वभावाच्यांनी टेंभुर्णीला ग्रामविकास अधिकारी चांगला लाभल्यामुळे गावातील अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. वेद रायगडाचा प्रतिष्ठान महाराष्ट्राचे प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर, प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्राची जाफराबाद तालुका अध्यक्ष श्री काष्पक, सचिव बालाजी शेवाळे, कोषाध्यक्ष गजानन शेळके, प्रसिद्ध चित्रकार संतोष आवटी, माजी सरपंच गणेश धनवाई, बाळकृष्ण धनवाई, शंकर धनवाई, आदींनी त्यांच्या अभिनंदन केले आहे. पूर्णवेळ ग्राम विस्तार अधिकारी मिळाल्यामुळे गावाच्या समस्या सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध राहू असे त्यांनी सांगितले. विविध योजना राबवताना येणाऱ्या अडचणी आता येणार नाहीत अशा प्रकारचे मनोगत त्यांनी व्यक्त केले. टेंभुर्णी सारख्या मोठ्या गावाचे ग्रामस्थ अधिकारी म्हणून मला मिळाल्याबद्दल त्यांनी शासनाचे आभार मानले.

# उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा; नोंद करा - पांगारकर

**जालना । प्रतिनिधी -** उत्कृष्ट सार्वजनिक गणेश मंडळ स्पर्धामध्ये सहभाग घेण्याचा आव्हान गणेश महासंघाचे अध्यक्ष अशोक पांगरकर, कार्यकारी अध्यक्ष एडवोकेट महेश धनावत यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या वतीने 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२४' चे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेत नोंदणीकृत संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सहभागी होऊ शकतात. सदर स्पर्धेचा अर्ज पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबईच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख ३१ ऑगस्ट २०२४ आहे. संपूर्ण भरलेला अर्ज mahotsav.pldagmail.com या ई-मेल आय. डी. वर पाठवणे आवश्यक आहे. अपूर्ण अर्ज रद्द ठरविण्यात येईल.

ही स्पर्धा निःशुल्क असून सांस्कृतिक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन, संस्कृतीचे जतन व संवर्धन याकरिता राबविण्यात आलेले उपक्रम, गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन, राष्ट्रीय व राज्य स्मारके, धार्मिक स्थळे यांविषयी जनजागृकता तसेच जतन व संवर्धन, विविध सामाजिक उपक्रम व कार्ये, पर्यावरणपूरक मूर्ती, पर्यावरणपूरक सजावट, ध्वनिप्रदूषण रहित वातावरण, गणेशभक्तासाठी केलेल्या सोयी सुविधा यांच्या आधारे केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि असेच समाजाभिमुख उपक्रम अधिकाधिक घडावेत म्हणून प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे.याच निकषांच्या आधारे स्पर्धेचे परीक्षण केले जाईल. ७ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांनी गठीत केलेली जिल्हास्तरीय समिती या स्पर्धेत सहभागी मंडळे किंवा संस्थांच्या उत्सवस्थळाला भेट देतील आणि जिल्हास्तरीय परीक्षण पूर्ण करतील. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे आणि पुणे हे ४ जिल्हे प्रत्येकी ३ आणि हे ४ जिल्हे वगळता अन्य ३२ अशा प्रत्येक जिल्ह्यातून एक यानुसार एकूण ४४ शिफारसी राज्यस्तरीय परीक्षणासाठी स्वीकारल्या जातील. राज्यस्तरीय परीक्षणात प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे ५ लाख, २.५ लाख आणि १ लाख रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. तसेच अन्य जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांना रु. २५,०००/- रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे.

या स्पर्धेत अधिकाधिक संख्येने सहभाग नोंदवण्याचे आवाहन शासनातर्फे करण्यात आले आहे. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी सर्वांनी आपापल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा अशी विनंती गणेश महासंघाचे अध्यक्ष अशोक पांगारकर यांनी केली आहे.

पान १ वरुन

## जिल्हाधिकाऱ्यांच्या दौऱ्याचा ...

व जिल्हा स्तरावर प्रदर्शने आयोजित करणे, विभागीय आणि जिल्हा माहिती कार्यालयांमार्फत योजनांची शासनासंबंधीची माहिती पुरविणे, शासकीय जाहिरातींचे वृत्तपत्रांना वाटप करणे या गोष्टींचा माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या कार्यात समावेश होतो. जनतेची मते व प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी राज्यात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व महत्वाच्या वृत्तपत्रांची व अन्य प्रकाशनांची रोजच्या रोज ह्या विभागामार्फत माहिती घेऊन ती शासनास पुरवली जाते. मुख्यालयात आणि राज्यभर सर्वत्र असंख्य प्रकारचे उपक्रम दैनंदिन स्वरूपात राबवण्यात येत असतात. त्यांची तत्काळ आणि प्रभावी प्रसिद्धी करण्याचे काम महासंचालनालयास करावे लागते. महासंचालनालयात बहुतेक सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी माहिती तंत्रज्ञानविषयक प्रशिक्षण घेतले असून या ज्ञानाचा लाभ ते आपल्या दैनंदिन कामकाजात करून घेत असतात.

सर्व जिल्हा माहिती अधिकारी हे पत्रकारितेचे पदवीधर/पदविकाधारक असून त्यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रत्यक्ष कामाचा अनुभवही घेतलेला असतो. दैनंदिन वृत्त प्रसारणाच्या कामाबरोबरच माध्यम प्रतिनिधींना अन्य प्रकारची माहिती/संदर्भ उपलब्ध करून देण्याचे आणि तत्सम जनसंपर्काचे कामही या अधिकाऱ्यांना करावे लागते त्यासाठी आवश्यक तेव्हा मोहिमा राबवण्यात येतात.

जनसंपर्क माध्यमांद्वारे शासन आणि जनता यांना जोडणारा एक दुवा ह्या नात्याने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या कामाचे स्वरूप दुहेरी आहे. विकास कार्यक्रमांच्या तसेच सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या अन्य कार्यक्रमांच्या बाबतीत शासनाची ध्येयधोरणे, भूमिका, उद्दिष्टे आणि कामगिरी याबद्दलची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम हे महासंचालनालय करीत असते त्याच वेळी या सर्व गोष्टींच्या बाबतीतील सर्वसामान्य जनतेच्या वृत्तपत्रांच्या माध्यमातून उमटलेल्या प्रतिक्रिया शासनाच्या नजरेस आणण्याची कामगिरीही ते बजावीत असते. या सर्व कामगिरीसाठी ही कार्यालये पूरक म्हणून काम करत असतात. दैनंदिन वृत्तविशेष प्रसारित करणे, प्रसिद्धी साहित्याचे वाटप करणे, विविध विषयावर निर्मित केलेले वृत्तचित्र नागरी तसेच ग्रामीण भागातून जनतेस नित्यनेमाने दाखविणे, विभागीय व जिल्हा स्तरावर प्रदर्शने आयोजित करणे, शासकीय जाहिराती स्थानिक, जिल्हा व विभागीय स्तरावर वितरित करणे आदी कामे ते पार पाडतात.

माहितीच्या प्रसारणाच्या दृष्टीने महासंचालनालयाकडे अद्ययावत अशी यंत्रणा उपलब्ध आहे. महाराष्ट्राबरोबरच दिल्ली आणि गोवा येथील कार्यालयेही ई-मेल/इंट्रानेटद्वारे जोडण्यात आली असून दैनंदिन स्वरूपाचे कामकाज संगणकाद्वारे केले जाते.

सर्व कार्यालयांकडे अत्याधुनिक स्वरूपाचे संगणक, लॅपटॉप, प्रिंटर आणि स्कॅनरसारखी यंत्रणा उपलब्ध आहे. आवश्यक तेव्हा अधिकाऱ्यांशी तातडीने संपर्क साधण्याच्या दृष्टीने Video Conferencing ची सुविधाही उपलब्ध आहे. विविध समारंभांचे चित्रीकरण करता यावे यासाठी सर्व जिल्ह्यात डिजिटल कॅमेरे उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. महासंचालनालयाच्या https://mahasamvad.in/ आणि www.dgipr.maharashtra.gov.in या दोन वेबसाईट कार्यरत आहेत.

## जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ ...

शिवसेना नेते प्रल्हादराव बोराडे, युवा सेना उपजिल्हाप्रमुख योगेशराव गणगे, युवा सेना उपतालुकाप्रमुख लिंबाजी बोराडे, खोराडसावंगी सर्कल प्रमुख सर्कल माऊली वायाळ, सुनील गुंड व शेतकरी बांधव यांची उपस्थिती होती.

## दहीहंडी ...

आदींनी परिश्रम घेतले. विशेष म्हणजे दहीहंडी फोडण्यापूर्वी बलात्कारांच्या प्रतीकात्मक पुतळ्यांना महिला, मुलींच्या हस्ते जोडे मारण्यात आले. गोविंदांनी डीजेच्या तालावर बेभान होऊन नृत्य करत चार थर लावून दहीहंडी फोडली. यावेळी परिसरातील महिला, नागरिक तरुणांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**जालना -** मिटकॉन प्रशिक्षण केंद्र, जालना व उद्योग विकास विभाग आणि शासकीय औद्योगिक विकास महामंडळे यांच्या वतीने जालना येथे दि.११ सप्टेंबर २०२४ पासुन एक महीना कालावधीत उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील प्रशिक्षण कार्यक्रमात युवक व युवतींसाठी स्वतःचा उद्योग/व्यवसाय उभारणीसाठी व कर्ज प्रकरण करण्यासाठी हा प्रशिक्षण वर्ग अंत्यत महत्त्वाचा राहणार आहे.या प्रशिक्षण कार्यक्रमात सौर ऊर्जा (सोलर एनर्जी) , विद्युत वाहणे (इलेक्ट्रिकल व्हेअकल) व सायबर सुरक्षा व इतर अनेक उद्योग या बाबतीत थेरी व प्रात्येक्षिकासह मार्गदर्शन राहणार आहे. या प्रशिक्षणात मशिनरी हाताळणे, सोलर एनर्जी प्लेट तयार करणे,कच्चामाल,साहीत्य,कॅपॅसिटी,जोडणी व विक्रीव्यवस्था, बिघाड दुरुस्ती व उपलब्ध प्लॅन्ट या सोबत उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा,व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निमशासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना,खादीग्राम उद्योगांच्या योजना, महामंडळाच्या विविध योजना, कृषी संलग्न योजना, राष्ट्रीय पशुधन योजना,प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था,भांडवल उभारणी ,मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने, प्रशिक्षण प्रमाणपत्र इत्यादी बाबतीत तज्ञ प्रशिक्षक, वरिष्ठ अधिकारी व यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन लाभणार आहे. अधिक माहिती व प्रवेश अर्जासाठी के डी दांडगे ,जिल्हा प्रकल्प अधिकारी जालना.मो.९४२३७३०९३२ येथे दि.११ सप्टेंबर २०२४ पर्यंत संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

# एसटी कामगारांचे धरणे आंदोलन; मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन प्रलंबित प्रश्न मार्गी लावू - आ. राजेश टोपे

**जालना । प्रतिनिधी -** एसटी कामगारांच्या प्रश्नांसंदर्भात तातडीने मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन आ. राजेश टोपे यांनी येथे दिले. एस.टी. कामगारांच्या प्रलंबित आर्थिक व महत्त्वाच्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी मंगळवार (दि ३) रोजी धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी आ. राजेश टोपे यांनी महाराष्ट्र एस.टी. कामगार संयुक्त कृती समितीच्या जालन्यातील पदाधिकाऱ्यांशी दूरभाषवरुन चर्चा करत त्यांनी कामगारांना आश्वस्त केले.

यावेळी आ. टोपे यांनी पदाधिकाऱ्यांशी चर्चा करतांना म्हटले आहे की, मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्याशी आपण स्वतः चर्चा करु, एसटी कामगारांचे प्रश्न गंभीर आहेत. मुख्यमंत्र्यांना याबाबत अवगत करुन बैठक घेण्यासाठी आग्रह करु आणि या बैठकीच्या माध्यमातून आपले प्रलंबित आर्थिक व महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढीच्या वाढीव दराच्या थकबाकीबाबत, सातवा वेतन आयोग लागू करणे यासह सर्व महत्त्वाच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी पुढाकार घेऊ व प्रश्न मार्गी लावू असे आश्वासन त्यांनी यावेळी पदाधिकाऱ्यांना दिले.

आ. राजेश टोपे यांच्या आदेशानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक शहर जिल्हाध्यक्ष राजेंद्र जाधव, जिल्हा शहराध्यक्ष नंदकिशोर जांगडे यांनी आंदोलनस्थळी भेट दिली. व आ. राजेश टोपे यांचा आंदोलनाला पाठींबा असल्याचे महाराष्ट्र एस.टी. कामगार संयुक्त कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांना सांगत या पदाधिकाऱ्यांशी राजेंद्र जाधव यांनी चर्चा केली. चर्चा अंती आ. राजेश टोपे यांना राजेंद्र जाधव यांनी फोनवरुन कामगारांचे प्रश्न सांगून या पदाधिकाऱ्यांचा संवाद साधून दिला.

महाराष्ट्र एस.टी. कामगार संयुक्त कृती समितीच्यावतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, रा.प. कामगारांच्या प्रलंबित आर्थिक मागण्यांवर दि. ११/०९/२०२३ रोजी शासन पातळीवर झालेल्या बैठकीत महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढीच्या वाढीव दराच्या थकबाकीबाबत मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली उपमुख्यमंत्री तथा मंत्री वित्त व नियोजन, उद्योग मंत्री यांच्यासह संघटनेच्या प्रतिनिधी समवेत १५ दिवसात बैठक घेऊन निर्णय घेण्याचेही मान्य केले होते. त्यास ९ महिन्यापेक्षा अधिक कालावधी उलटून गेला असतांनाही अद्याप बैठक झालेली नाही. रा.प. कामगारांना सदरची थकबाकी मिळणे अपेक्षित आहे. त्याबरोबर त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्याचा निर्णय ही प्रलंबित आहे.

एस.टी. कामगारांची निर्माण झालेली नाराजी विचारात घेऊन म.रा.मा.प. महामंडळातील महाराष्ट्र एस.टी. कामगार संघटना (मान्यताप्राप्त संघटना), महाराष्ट्र एस.टी. कामगार सेना, महाराष्ट्र एस.टी. कर्मचारी काँग्रेस, कास्ट्राईब रा.प. कर्मचारी संघटना, महाराष्ट्र एस.टी. वर्कर्स काँग्रेस (इंटक), महाराष्ट्र मोटार कामगार फेडरेशन, महाराष्ट्र एस.टी. कामगार कॉग्रेस, राज्य परिवहन यांत्रिक कामगार संघटना, महाराष्ट्र परिवहन मजदूर युनियन, रिपब्लिकन एस.टी. कर्मचारी संघटना, बहुजन रा.प. कर्मचारी संघटना या संघटनांची संयुक्त कृती समिती स्थापन करून सदरच्या कृती समितीच्यावतीने रा.प. कामगारांचे खालील प्रलंबित आर्थिक मागण्यांची महाराष्ट्र राज्याची विधानसभेची आचार संहिता लागू होण्यापुर्वी सोडवणूक होण्यासाठी दि. ९ व १० जुलै, २०२४ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे धरणे आंदोलन करण्यात आले. सदर आंदोलनानंतरही सदर प्रश्नांची सोडवणूक न झाल्यामुळे दि. ३ सप्टेंबर २०२४ या दिनांका पासून राज्यभर बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

एस.टी. कामगारांचे वेतन कमी असल्यामुळे राज्य शासनाने माहे



नोव्हेंबर, २०२१ पासून ज्या एस.टी. कामगारांची सेवा ०१ ते १०वर्षापर्यंत झालेली आहे त्यांच्या मुळ वेतनात रु. ५०००/-, ११ ते २० वर्षापर्यंत सेवा झालेल्या कर्मचा-यांच्या मुळ वेतनात रू. ४०००/- व २० वर्षापेक्षा जास्त सेवा झालेल्या कर्मचा-यांच्या मुळ वेतनात रू. २५००/- अशी वाढ लागू केली. सदर वाढीमुळे सेवा जेष्ठ कर्मचा-यांच्या मूळ वेतनात मोठी तफावत निर्माण झालेली आहे. सदरची तफावत दूर करण्यासाठी सरसकट रु. ५०००/- वाढ दिल्यास सदरची तफावत दूर होणार असल्याचेही निवेदनात नमूद आहे. एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन, त्यातील तफावत, कामगारांना लागू केलेली वेतनवाढ, महागाई भत्याची थकबाकी, वैद्यकिय खर्च, शिस्त व अपिल कार्यपद्धतीत बदल, कर्मचारी व कुटुंबियांसाठी एसटी पास सवलत, आदी समस्या मांडण्यात आल्या.

आ. राजेश टोपे यांच्यावतीने राजेंद जाधव, नंदकिशोर जांगडे यांनी निवेदन स्विकारले. यावेळी एम.एस. पवार, पी. टी. कर्वे, एस. एस. चव्हाण, पी. के. कुलकर्णी, शेख जुबेर, एम. बी. गवई, टी. ए. लकडे, जे.पी. देशमुख यांच्यासह कृती समितीचे पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

## श्री गणेश महासंघाच्या कार्याध्यक्षपदी निवडीबद्दल ॲड धन्नावत यांचा सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** श्री गणेश महासंघाच्या कार्याध्यक्षपदी ॲड. महेश धन्नावत यांची निवड झाल्याबद्दल अखिल भारतीय अग्रवाल समाजाच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी अखिल भारतीय अग्रवाल समाजाचे जालना जिल्हाध्यक्ष दिलीप अग्रवाल, कोषाध्यक्ष सचिन जयपुरिया, सचिव अनुज बगड़िया, उपाध्यक्ष सचिन भारूका, ज्येष्ठ विधीज्ञ ड सीताराम धन्नावत, कैलाश भारतीया, गिरीश अग्रवाल, गोपाल मल्लावत, अतुल गिंदोडिया, ॲड. बॉबी अग्रवाल, ॲड. अश्विनी धन्नावत यांची उपस्थिती होती.

श्री गणेश महासंघाचा आजवरचा प्रवास विशद करताना ड. महेश धन्नावत म्हणाले की, सर्वांनी एकत्र येऊन गणेशोत्सव आयोजित करण्याच्या उद्देशाने श्री गणेश महासंघाची स्थापना झालेली आहे.

महासंघाच्या माध्यमातून रक्तदान शिबिरे, आरोग्य शिबिरे, समाज प्रबोधन, वैद्यकीय मदत आणि शैक्षणिक उपक्रम यासारख्या सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे दरवर्षी आयोजन केले जाते. माझ्यावर कार्याध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवली, हे मी माझे भाग्य समजतो, असे ते म्हणाले.

## मेहनतीने आकाश बनला सीआरपीएफ जवान

**टेंभुर्णी -** घरची परिस्थिती अतिशय बेताची असतानाही जाफराबाद तालुक्यातील सावंगी येथील आकाश गुंडे याने पोलिस भरती परीक्षेत यश मिळवले आहे. त्याची जालना सीआरपीएफमध्ये निवड झाली आहे.

वडिलोपार्जित कुंभारी व्यवसाय. रांजण, माठ आदींपासून पार गणपती, गौरी आदी मूर्ती त्यांच्या परिवारात बनविल्या जातात. आकाशने या व्यवसायात आपल्या आई-वडिलांना मदत करताना मातीकाम केले. जिद्दीने स्पर्धा परीक्षा दिल्या. यामधून आकाशची निवड जालना सीआरपीएफमध्ये झाली.

आमचा कुंभार व्यवसाय असल्याने बालपणापासून आजी, आई-वडील यांचे कष्ट पाहत आलो आहे. या व्यवसायात त्यांना मदत करताना किती कष्ट सोसावे लागतात याचा जवळून अनुभव घेतला. या कष्टासोबतच जिद्द, चिकाटी, मेहनतीने स्पर्धा परीक्षेचा अभ्यासही सुरू ठेवल्याने यश मिळाले असल्याची प्रतिक्रिया आकाशने दिली आहे.

## शहरातील महापुरुषांच्या पुतळा व परिसराचे तात्काळ सुशोभीकरण करावे - संध्या देठे



**जालना । प्रतिनिधी -** शहरात विविध ठिकाणी महापुरुषांचे पुतळे बसविलेले आहेत. परंतु जालना शहर महानगरपालिकेचे या पुतळ्यांकडे दुर्लक्ष होत आहे. अनेक पुतळा व परिसरात अस्वच्छता आहे. परिणामी महापुरुषांचा अवमान होत आहे. त्यामुळे शहरातील सर्वच महापुरुषांची पुतळे व आजूबाजूचा परिसर चौकाचे सुशोभीकरण करण्यात यावे जेणेकरून सर्व महापुरुषांचा सन्मान राखला जाईल. तसेच जालना शहरातील विविध रस्त्यांवर मधोमध महावितरण विद्युत कंपनीचे पोल आलेले आहेत. त्यामुळे दुर्घटना होऊन अपघात होत आहे. ते पोल तात्काळ हटवण्यात यावे. येणाऱ्या काळात सण-उत्सव असून या पार्श्वभुमीवर विशेष स्वच्छता मोहीम राबवून फवारणी करण्यात यावी अशी मागणी जालना शहर महानगरपालिका आयुक्त संतोष खांडेकर यांच्याकडे माजी नगरसेविका तथा भाजपा महिला मोर्चाच्या जालना जिल्हाध्यक्ष सौ. संध्या संजय देठे यांनी केली आहे. यांना सौ देठे यांनी दिले आहे.

